# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १२/०६/२०२२ (रविवार)

---

## घरफोडी

**पोलीस स्टेशन काटोल** :– अंतर्गत नबिरा ले आउट काटोल २ किमी पश्चिम. येथे दिनांक ११/६/२२ चे ०९/०० ते ०९/१५ वा. फिर्यादी यांची काकु श्रीमती साधना संजयराव धोटे हे कामानिमित्त वर्धा येथे घराचे दाराला कुलुप लावून गेले होते. दि ११/६/२२ रोजी फिर्यादी यांना काकुने फोन करून आपले घराचे दार उघडे आहे, असे सांगितले असता, फिर्यादी ने घटनास्थळी जावुन बघितले असता, घराचे प्रवेशद्वार उघडे आहे. घरातील हॉलमधील सीसीटीव्ही डीव्हीआर किंमती ६,००० रूपये, सज्जावरील सुटकेसमधील जुने वापरते चांदीचे पांदन किंमती १०,०००/– रू. जुन्या वापरत्या चांदीच्या वाट्या किंमती १०,०००/– रू., चांदीची अंतरदानी २,०००/– रूपये, चांदीचे करडे आणि दोन आकडे किंमती २,०००/– रू., देवघरातील अलमारीमधील पर्समधील १२,०००/– रू. शिक्के ३,०००/– रूपये असा **एकुण ४५,०००/– रू चा माल कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडून आत प्रवेश करून चोरून नेला आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कपिल नरेंद्रराव धोटे वय ३७ वर्ष रा. धंतोली काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोउपनि निभोंरकर सा मो नं ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

## रेंती चोरी करणा–या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा** – अंतर्गत बिना संगम शिवार ०५ कि.मी पूर्व, येथे दिनांक ११/०६/२२ चे ०३/०० ते ०४/०० वा. दरम्यान, यातील बोलेरो पिकअप गाडी क्र एम एच ४० बी एल ९९३२ चा चालक नामे– रोशन राजीराम बेलेकर रा. न्यु नांदा कोराडी हा त्याचे गाडी मध्ये अवैधरित्या बिना परवाना बिना संगम रेती घाटातील कन्हान नदीचा पात्रातील अंदाजे ०१ ब्रास रेती किंमती ४,०००/– रू चा चोरी करून वाहतुक करताना मिळुन आल्याने त्यांची गाडी **बोलेरो पिकअप गाडी क्र एम एच ४० बी एल ९९३२ व त्यात असलेली अंदाजे ०१ ब्रास रेती किंमत ४,०००/– रू असा एकुन ३,०४,०००/– रू चा माल जप्त** करण्यात आला असुन सदर आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे नापोशी राजु विश्वनाथ भोयर यांचे रिपोर्टवरून पोस्टे खापरखेडा येथे आरोपी विरूध्द कलम ३७९ भादवि अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला, पुढील तपास पोहवा ठाकरे पो स्टे खापरखेडा मो नं ९९२३३८८७२२ करीत आहेत.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत पाढुर्णा रोड हेटी शिवार नागमंदीर जवळ, सावनेर २ किमी पश्चिम. दिनांक १०/०६/२०२२ चे २०/०० वा. दरम्यान, यातील फिर्यादी हा त्याच्या सासरा राधेश्याम धुर्वे व राजाराम मरकाम याचे सोबत सावनेर येथुन बाजार करुन सावनेर कडुन पारडी हेटी येथे पायदळ पाढुर्णा रोडनी जात असता पाठीमागुन येणारी मोटर सायकल क्र एम.एच ४०, बी डब्लु ०६९८ चा चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित आणुन सावनेर ते पाढुर्णा रोडवरील नागमंदीर जवळ पाठीमागुन **फिर्यादीचा सास–याला जोरदार धडक दिल्याने फिर्यादीचा सासरे खाली पडुन जखमी झाले. तसेच मोटर सायकल चालक सुध्दा स्वता खाली पडुन जखमी झाले आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राकेश शनिलाल मरकाम वय २५ वर्ष रा. नैनपुर जि. मंडला ह मु. पारडी हेटी शिवार ता. सावनेर यांचे रिपोर्टवरून वाहन क्र एम.एच ४० बी डब्लु ०६९८ चा चालक नामे अरविंद रामकृष्ण डोळस रा. नरसळा मंगसा ता. सावनेर यांचे विरूध्द कलम २७९, ३३७, ३३८ भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गून्हयाचा तपास सफौ. अनिल तिवारी पोस्टे सावनेर मो.न ९६८९८९१४८६ करीत आहे.

## लावारीस कुत्र्यांनी चावा घेतल्याने गेले चिमुकल्यांचे प्राण

**पोलीस स्टेशन काटोल :–** अंतर्गत नगर परिषद गार्डन धंतोली काटोल २ किमी पश्चिम, येथे दिनांक ११/६/२२ चे ०६/०० वा. यातील फिर्यादी ची पुतनी नामे – विधी जयवार ही फिर्यादीस चे मुलगा नामे– विराज राजेंद्र जयवार वय साडेचार वर्ष रा. नबिरा काटोल याला घेवून नगर परिषद गार्डन धंतोली येथे जात असता, गार्डनमध्ये बसलेल्या ८ ते ९ कुत्र्यांनी फिर्यादीचे मुलाचे अंगावर अचानक धावून पडले व अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी चावा घेवून त्याचे डोक्याचे व ईतर प्रायवेट अंगाचे मास खाल्ले असता, फिर्यादी हे आपले मुलाला घेवून उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय काटोल येथे घेवून गेले डॉक्टरांनी नी तपासून मुलाला तपासून मृत घोषित केले. **मृतकाला लावारीस कुत्र्यांनी शरीरावर चावा घेवून प्रायवेट अंग व डावा डोळा खाल्याने मरण पावला. असे डॉक्टरांचे रिपोर्टवरून सदर मर्ग नोंद.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेद्रं मारोतराव जयवार वय ३९ वर्ष रा. धंतोली काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री निभोंरकर मो नं ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**